# प्रेसनोट

दिनांक–२८/०१/२०२५

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नांव | अॅन्टी करप्शन ब्युरो अकोला घटक |
| २ | आरोपीचे नांव, हुद्दा, वर्ग व कार्यालयाचा पत्ता | १) प्रफुल जनार्धन दिंडोकार, वय–३३ वर्ष, पद– पोलीस शिपाई, ब.नं. २३४७, पोस्टे. दहिहांडा ता.जि. अकोला, वर्ग–३, रा. सोमवार वेस अकोट ता. अकोट जि. अकोला ह.मु. श्री सुनिल मिश्रा यांचे घरी भाड्याने, दहिहांडा ता.जि. अकोला.<br>२) खाजगी ईसम श्री. शंकर जानराव तरोळे, वय– ६२ वर्ष, व्यवसाय–शेती, तंटामुक्ती अध्यक्ष ग्राम पातोंडा ता अकोट जि. अकोला रा. पातोंडा ता.जि. अकोला |
| ३ | सापळा तारीख | दिनांक २८/०१/२०२५ रोजी |
| ४ | मागणी केलेली रक्कम | १०,०००/– रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती ८,०००/–रूपये स्विकारण्याचे मान्य केले. |
| ५ | स्विकारलेली लाच रक्कम | सदरची लाच रक्कम रू. ८,०००/– आरोपी क्र. २ यांने मार्फतीने स्विकारली. |
| ६ | घटनास्थळ | दहिहांडा येथील दहिहांडा–दर्यापूर रोडवरील हॉटेल यशवंत बार अॅन्ड रेस्टॉरंटचे उजव्या बाजुला असलेल्या मोकळ्या जागेत, ता. जि. अकोला |

प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील तक्रारदार यांनी दिनांक– २०/०१/२०२५ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, अकोला येथे तक्रार दिली की, तक्रारदार यांचे व त्यांचा आई–वडील व भावांविरूध्द पोलीस स्टेशन दहिहांडा ता जि अकोला येथे एन.सी. नोंद असुन सदर एन.सी. प्रकरणात कोणतीही कायदेशीर कार्यवाही न करता, सदर प्रकरण आपसात मिटवुन निपटुन टाकण्याकरीता कुटासा बीटचे पोलीस कर्मचारी श्री अवचार व श्री दिंडोकार हे रू. १०,०००/– लाच रक्कमेची मागणी करीत आहेत.

सदर तक्रारीवरून दिनांक २७/०१/२०२५ रोजी पंचासमक्ष आजमाविण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान पोलीस कर्मचारी प्रफुल दिंडोकार यांनी तक्रारदारास रू. १०,०००/– लाच रक्कमेची मागणी करून तडजोडीअंती रू. ८,०००/– लाच रक्कमेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

दिनांक २८/०१/२०२५ रोजी दहिहांडा येथे शासकीय पंचासमक्ष सापळा कार्यवाही आजमाविण्यात आली असता, सदर सापळा कारवाई दरम्यान आरोपी क्र. १ यांचे सांगण्यावरून आरोपी क्र. २ यांनी तक्रारदाराकडुन रू. ८,०००/– लाच रक्कम स्विकारली असता, अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय अकोलाच्या सापळा पथकाने यशस्वी सापळा कार्यवाहीअंती दोन्ही आरोपी यांना ताब्यात घेवुन त्यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम ७, ७–A प्रमाणे पोलीस स्टेशन दहीहांडा ता. जि. अकोला येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. मारूती जगताप, पोलीस अधीक्षक अॅ.क.ब्युरो अमरावती, श्री. सच्छिंद्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक अॅ.क.ब्युरो अमरावती व श्री. मिलींदकुमार अ. बहाकर पोलीस उपअधीक्षक अॅ.क.ब्युरो अकोला यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. सचिन सावंत, पोलीस अंमलदार प्रदीप गावंडे, संदीप ताले, डिगांबर जाधव, अभय बावस्कर यांनी केली आहे.

तरी सर्व नागरीकांना आव्हान करण्यात येते कि कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी अथवा त्यांच्यावतीने कोणत्याही खाजगी इसमाने त्यांचे कोणतही शासकीय काम करून देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तात्काळ अॅन्टी करप्शन ब्युरो अकोला येथील खालील क्रमांवर संपर्क साधावा

मोबाईल क्र. श्री. मिलींदकुमार अ. बहाकर पोलीस उपअधिक्षक–९१५८८२२६७६
श्री सचिन सावंत पोलीस निरीक्षक–८८५५८३०८३०

ऑफिस फोन नं. ०७२४–२४१५३७०
टोल फ्रि क्रं. १०६४

( सचिन सावंत )
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, अकोला